महाराष्ट्र शासन

# ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे

जयप्रकाश नारायण रोड, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे-४११ ००१
(इमारत व दळणवळण विभाग)
दुरध्वनी क्र.२६१२८००० विस्तार-२४२४ संकेतस्थळ- http:/www.bjmcpune.org फॅक्स क्र.२६१२६८६८

जा.क्र.ससरु/इवद/पोर्टेबलटॉय/दरपत्रके/0660 /२०१९ दिनांक :- 08/११/२०१९

प्रति,

ऑनलाईन संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता

विषय :- ससून सर्वोपचार रुग्णालय आवारातील शौचालये पे ॲण्ड युज तत्वावर चालविण्यासाठी दरपत्रक सादर करणेबाबत.

संदर्भ :- दि.२८.०२.२०१९ ची मान्य टिप्पणी.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे या संस्थेच्या आवारातील खालील नमूद केलेले शौचालये (पे ॲण्ड युज) पैसे घ्या व वापरा या तत्वावर चालविण्यास इच्छूक असलेल्या सर्व नामांकित व अनुभवी व्यक्ती/संस्था/ठिकेदार यांना कळविण्यात येते की, शौचालयाचे मासिक भाडे व दुरुस्ती/दिखभाल व दैनंदिन स्वच्छता करणेसह ३ वर्षे करारनाम्यावर चालविण्यास द्यावयाचे आहे. या संस्थेच्या आवारामध्ये खालील नमूद ठिकाणी असलेले शौचालय चालविण्यासाठी पे ॲण्ड युज या तत्वावर चालविण्यास द्यावयाचे आहे.

| अ.क्र. | संस्थेच्या आवारामधील शौचालय असलेले ठिकाण | संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री | | | पुरुष | | |
| | | युरीनल | शौचालय | बाथरुम | युरीनल | शौचालय | बाथरुम |
| ०१ | अपघात विभागा शेजारील (बँक ऑफ बडोद्याचे बाजूस) १२०० चौरस फुट | — | ५ | १ | ११ | ३ | १ |
| ०२ | न्यायवैद्यकशास्त्र विभागा शेजारील (श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट मार्फत रुग्णांच्या नातेवाईकांसाठी विश्रांतीगृहाजवळ) ( ) | — | २ | १ | ३ | २ | १ |

वरील नमूद केल्याप्रमाणे शौचालये पे ॲण्ड युज तत्वावर अटी व शर्तीच्याअधिन राहून चालविण्यात द्यावयाचे असून त्यासाठी दोन लिफाफा पध्दतीने सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी आपण आपल्या कंपनीचे दरपत्रक दि.29 /११/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे.

अंतिम दिनांकानंतर आलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे.

पान क्र.२ वर

-: अटी व शर्ती त्याचप्रमाणे दरपत्रकासोबत लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे :-

१) दुकाने अधिनियमानुसार नोंदणी क्रमांक व सेवाकर नोंदणी दाखला

२) संबंधित ठेकेदाराकडे कंत्राटी लेबर कायदा १९७० चा परवाना असणे आवश्यक आहे.

३) भविष्य निर्वाहनिधी कायदा १९५२ चा परवाना असणे आवश्यक.

४) राज्य कामगार विमा अधिनियम १९४८ चा परवाना असणे आवश्यक

५) जीएसटी क्रमांक

६) मागील तीन वर्षाचा आर्थिक उलाढालीचा चार्टर्ड अकांउंटचा दाखला जोडणे आवश्यक (आय.टी.आर.) सहित.

७) कामगार कल्याण निधी दाखला जोडणे आवश्यक

८) ई.एस.आय. व पी.एफ. भरलेबाबतचे मागील तीन महिन्यांचे चलने जोडणे आवश्यक

९) स्वच्छतागृह चालविण्याचा सरकारी, निमसरकारी संस्थेचे काम समाधानकारक पूर्ण केल्याचा मागील तीन वर्षाचा दाखला जोडणे आवश्यक.

१०) राष्ट्रीयकृत बँकेची सॉलव्हन्सी किमान ५ लक्ष असलेबाबतचे प्रमाणपत्र.

११) एनजीओ, मित्रमंडळ, गणेश मंडळ, पब्लिक ट्रस्ट इ. संस्था असल्यास वरील कागदपत्रां व्यतिरिक्त खालील कागदपत्रे आवश्यक

१२) लेबर कायदा १०७० चा परवाना. १३) व्यवसाय प्रमाणपत्र.

अ) धर्मादाय आयुक्तालयातील नोंदणी प्रमाणपत्र ब) घटनेचे किंवा उद्दीष्टांची प्रत

क) मागिल तीन वर्षाचा ऑडिट रिपोर्ट धर्मादाय आयुक्तास सादर केल्याची प्रत

ड) सदर दरपत्रके भरणेसाठी संस्थेच्या सभासदांनी सर्व साधारण सभेमध्ये ठराव केलेल्या ठरावाची प्रत

इ) दरपत्रके भरणे व निर्णय घेणेबाबतचे अधिकारपत्र ई) संस्थेचे पॅन कार्ड

१४) सहकारी मजूर संस्था,बेरोजगार संस्था, सोसायटी असल्यास वरील कागदपत्रां व्यतिरिक्त खालील कागदपत्रे आवश्यक.

अ) उप निबंधकाकडील नोंदणी दाखला जोडणेआवश्यक

ब) सह निबंधकाचा वर्गीकरणाचा दाखला (दर्जाबाबतचा दाखला) क) घटनेचे उद्दिष्ठ प्रत

ड) मागील तीन वर्षाचा ऑडीट रिपोर्ट उपनिबंधकाकडे सादर केल्याची प्रत.

वरील कागदपत्रे आवश्यक असून स्वच्छतागृहाची खालील प्रमाणे कामे करणे बंधनकारक राहिल

१) सदरील स्वच्छतागृहाची रंगरंगोटी व देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी (दारे,खिडक्या,नळ, साखळी, कडीकोयंडे, काच, संडासभांडे, कडप्पा, स्त्री व पुरुष सर्व युनिनल (मुतारी) इ. सर्व बाबी) दुरुस्त करुन स्वच्छतागृह सुरळीत चालण्याच्यादृष्टीने आवश्यक ती सर्व कामे करणे.

२) यशस्वी ठेकेदारास या संस्थेसोबत आवश्यक तो करारनामा करणे बंधनकारक असून त्यासाठी होणारा सर्व खर्च ठेकेदार यांनी करावयाचा आहे. तसेच शौचालय सुरु ठेवण्याचा कालावधी, कर्मचारी व स्वच्छतेविषयक इतर योग्य त्या अटी करारनामा करतांना निश्चित करण्यात येतील.

-: लिफाफा क्र.२ मध्ये फक्त दर नमूद करावा :- (दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाफ्यामध्ये टाकणे)

१) संस्थेने वर नमूद दोन्ही शौचालयासाठी किमान मासिक भाडे रु.१२,०००/- इतके निश्चित केले असून त्यापेक्षा कमी दर आल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

२) मुतारी स्त्री व पुरुष सर्वांसाठी मोफत असून शौचाकरिता रु.५/- व अंघोळीकरीता रु.१०/- इतका दर निश्चित करण्यात आलेला आहे. यापेक्षा जास्त दर आकारता येणार नाही. तसेच १२ वर्षे खालील मुल-मुलींना आणि अपंग व्यक्तींसाठी संडास वापरासाठी मोफत असेल.

२) यशस्वी ठेकेदारास रु.४०,०००/- इतकी अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेका कालावधी संपेपर्यंत या संस्थेकडे जमा ठेवणे बंधनकारक राहील.

३) वरील कागदपत्रांची पुर्तता करीत असल्यावरच लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

४) स्वच्छता व देखभाल दुरुस्ती, काम बंद किंवा वरील दरापेक्षा जास्त पैसे घेतले तर प्रती दिवस १००/- प्रमाणे दंडनीय कार्यवाही करण्यात येईल.

५) सदर कागदपत्रांमध्ये काही बदल करणे आवश्यक असल्यास त्याचे अधिकार पे ॲण्ड युज समितीस असणार आहेत.

६) कोणतेही दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार व ठेक्याची मुदतवाढ देण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

वरीलप्रमाणे अटी शर्ती वाचल्या असून त्या बंधनकारक असल्याबाबत मान्य करीत आहेत.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक असून संपूर्ण नांव संपूर्ण पत्ता व मोबाईल क्र.दयावा.

अधिष्ठाता
ससून सर्वोपचार रुग्णालय
पुणे.

Scanned by CamScanner